राज्य शासकीय अधिकारी /कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजास्तव हॉटेल वास्तव्यासाठी देय असलेल्या दैनिक भत्याच्या दरांत सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रवास-१०१३/प्र.क्र.३/सेवा-५**
मंत्रालय,मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
तारीख: २ मे,२०१३

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांकः प्रवास-१०११/प्र.क्र.२/सेवा-५,दि.३ मार्च,२०१०

२) शासन निर्णय क्रमांकः प्रवास-१०११/प्र.क्र.२२/सेवा-५,दि.२७ डिसेंबर,२०११

३) शासन निर्णय क्रमांकः प्रवास-१०११/प्र.क्र.२२/सेवा-५,दि.१२ जानेवारी,२०१२.

**प्रस्तावना**

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना देय असलेल्या प्रवास व दैनिक भत्याच्या दरांत उपरोक्त शासन निर्णय दि.३ मार्च,२०१० अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.सदर शासन निर्णयातील परिच्छेद ९ येथील तक्ता क्र."ब" नुसार अनुसूचित दर आकारणाऱ्या हॉटेलमधील वास्तव्याकरीता विहीत केलेल्या दैनिक भत्याच्या दरांत वरील २) येथील शासन निर्णयानुसार सुधारणा केलेल्या आहेत.तथापि शासकीय दौऱ्यावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिल्ली,मुंबई,कोलकाता,चेन्नई,बंगळुरु व हैद्राबाद शहरांतील अनुसुचित दर आकारणाऱ्या हॉटेलमध्ये वास्तव्य केल्यास देय असलेल्या दैनिक भत्यातून दैनंदिन खर्च भागविणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.ही बाब विचारात घेता शासन निर्णय दि.२७ डिसेंबर,२०११ अन्वये विहीत केलेल्या दैनिक भत्याच्या दरांत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

राज्य शासकीय व इतर पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजास्तव दौऱ्यावर असतांना दिल्ली,मुंबई,कोलकाता,चेन्नई,बंगळुरु व हैद्राबाद शहरांतील अनुसुचित दर आकारणाऱ्या हॉटेलमध्ये वास्तव्य केल्यास देय असलेल्या दैनिक भत्याच्या दरांत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | श्रेणी | अधिकारी/कर्मचारी धारण करीत असलेले ग्रेड वेतन | दिल्ली,मुंबई,कोलकाता,चेन्नई,बंगळुरु व हैद्राबाद | |
|---|---|---|---|---|
| | | | शासन निर्णय दि. २७-१२-२०११ नुसार दर | सुधारीत दर |
| १. | प्रथम श्रेणी | अ) रु.८ ९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG+श्रेणी) | रु.३०००/- | रु.५०००/- |
| | | ब) रु.६ ६००/- व त्याहून अधिक मात्र रु.८ ९००/- पेक्षा कमी | रु.२०००/- | रु.३०००/- |
| २. | द्वितीय श्रेणी | अ) रु.५ ४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६ ६००/- पेक्षा कमी | रु.२०००/- | रु.२०००/- |
| | | ब) रु.४ ४००/-व त्याहून अधिक मात्र रु.५ ४००/- पेक्षा कमी | रु.१५००/- | रु.१५००/- |
| ३. | तृतीय श्रेणी | अ) रु.४ २००/- व रु.४ ३००/- | रु.९००/- | रु.९००/- |
| | | ब) रु.४ २००/-पेक्षा कमी | रु.८००/- | रु.८००/- |

तसेच दैनिक भत्ता मंजूर करण्यासंदर्भातील वरील १) येथील शासन निर्णय दि.३ मार्च,२०१० मधील अन्य अटी कायम राहतील. सुधारीत दर सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५०२१५४७४१८७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dahiphale Uddhav Rabhaji

Digitally signed by Dahiphale Uddhav Rabhaji
DN: c=IN, o=Government of maharashtra, ou=FD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dahiphale Uddhav Rabhaji
Date: 2013.05.02 16:00:29 +05'30'

(उध्दव र.दहिफळे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव

२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३) उपमुख्यमंत्र्यांचे प्रधआन सचिव
४) सर्व मंत्री आणि राज्यमंत्र्यांचे स्वीय सहायक
५) सर्व मंत्रालयीन विभाग
६) मंत्रालयीन सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभागप्रमुख
७) प्रबंधक,उच्च न्यायालय(अपील शाखा),मुंबई
८) प्रबंधक,उच्च न्यायालय(मूळ शाखा),मुंबई
९) सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
१०) सचिव,महाराष्ट्र विधानमंडल सचिवालय,मुंबई
११) प्रबंधक,लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,मुंबई
१२) आयुक्त,राज्य माहिती आयोग,मुंबई
१३) सचिव,राज्य निवडणूक आयोग,मुंबई
१४) प्रबंधक,महाराष्ट्र प्रशआसकीय न्यायाधिकरण,मुंबई/नागपूर/औरंगाबाद
१५) राज्य महिला आयोग,मुंबई
१६) सर्व विभागीय आयुक्त
१७) सर्व जिल्हाधिकारी
१८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषदा
१९) महासंचालक,यशदा,पूणे
२०) महालेखापाल-१ (लेखा परिक्षा),महाराष्ट्र,मुंबई
२१) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र,मुंबई
२२) महालेखापाल-२ (लेखा परिक्षा),महाराष्ट्र,नागपूर
२३) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र,नागपूर
२४) सिनियर रिसर्च ऑफीसर,पे सर्च युनिट,वित्त मंत्रालय,नवी दिल्ली
२५) संचालक लेखा व कोषागारे,मुंबई
२६) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
२७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
२८) बहुजन समाज पार्टी,डी-१ इन्सा हटमेंट,आजाद मैदान,मुंबई-१
२९) भारतीय जनता पार्टी,महाराष्ट्र प्रदेश,सी.डी.ओ.बरॅक क्र,१,योगक्षेमसोर,नरीमन पॉईंट,मुंबई-१३
३०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी,(महाराष्ट्र),३१४ राजभवन,एस.व्ही पटेल रोड,मुंबई-४
३१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी,(मार्क्सवादी),जनशक्ती हॉल,ग्लोबमील पॅलेस,वरळी,मुंबई-१३
३२) महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय),समिती,टिळक भवन दादर,मुंबई-३५
३३) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,राष्ट्रवादी भवन,फ्री प्रेस जर्नल मार्ग,नरीमन पॉईंट,मुंबई-२१
३४) शिवसेना,शिवसेना भवन,गडकरी चौक,दादर,मुंबई-२८
३५) निवड नस्ती वित्त विभाग(सेवा-५)